**नियमित दिवाणी दावा क्र. १३३७/२०१५ मधील नि.क्र. ५३ वरील आदेश**
( राधाकिसन कासार वि. बाळू माळी )

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या म्हणण्यानुसार, दावा जाहिर ठराव व मनाईसाठी दाखल आहे. प्रतिवादी क्र. ६ मयत असल्याचे बेलिफ अहवालावरून वादीला प्रथमतः समजलेले आहे. प्रतिवादी क्र.६ चे वारस आवश्यक पक्षकार आहेत. त्यांनी शेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादींनी अर्जावर म्हणणे देवून अर्जास जोरदार हरकत घेतलेली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार वादीचा अर्ज खरा नाही. प्रतिवादी क्र. ६ दि. २४/११/२०१२ रोजी मयत झालेला आहे. वादीने ९० दिवसाच्या आत मयताच्या वारसांना अभिलेखावर घेतलेले नाही. त्यामुळे दावा अबेट झालेला आहे. वादीने सुमारे ५ वर्षानंतर सदर अर्ज दिलेला आहे. अर्ज कायदेशिर नाही. त्यांनी शेवटी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव, ताबा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ६ हे दावा दाखल करण्यापुर्वीच मयत झालेले आहेत. त्यामुळे दावा मयताविरूध्द अबेट होण्याचा व मयताचे वारस अभिलेखावर घेण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. सबब, मयताचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी व प्रतिवादींनी अर्जावर दिलेले म्हणणे संपूर्णतः गैर लागु आहे.

**०५.** सदर दावा जाहिर ठराव व ताबा मिळणेकामी दाखल आहे. प्रतिवादी क्र.६ यांना दाव्यात दुरूस्ती करून पक्षकार म्हणून सामील केलेले आहे. त्यावरून प्रतिवादी क्र.६ यांचे वारसही दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. वादीने सदर वारसांना मयत प्रतिवादी क्र.६ यांचे वारस म्हणून सामील करण्याऐवजी स्वतंत्र प्रतिवादी म्हणून सामील करणे योग्य, कायदेशिर व आवश्यक आहे. सबब, अर्ज मयत प्रतिवादीचे वारसांना अभिलेखावर घेण्याचा असला तरी तो

दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-१, नियम -१० प्रमाणे आहे असे समजुन मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल, असे मला वाटते.

**०६.** दावा स्थावर मिळकतीबाबत असून त्यामध्ये उभयपक्षकारांचे हक्क हितसंबंध गुंतलेले आहेत. सदर दाव्यातील संपूर्ण वाद विषय एकाच वेळी परिणामकारकपणे निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.६ म्हणून सामील केलेल्या इसमाचे अर्जात नमूद केलेले कायदेशिर वारसांची न्यायालयासमोरील हजेरी उपयुक्त ठरणार आहे. वादीने वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ करणेकामी दिलेला निशाणी क्र. ५७ व प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दावा अबेट झाल्याचा हुकूम रद्द करणेकामी दिलेला निशाणी क्र. ५५ वरील अर्ज माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी यापुर्वीच खर्चासह मंजूर केलेले आहेत. प्रतिवादींनी सदर खर्चाची रक्कमही स्विकारलेली आहे. त्यामुळे अर्जात नमूद इसमांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्याची परवानगी देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. वरील विवेचनावरून मी न्यायाचे दृष्टीने खालील आदेश पारित करण्यात येतो:-

**-: <u>आ दे श</u> :-**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जात नमूद इसमांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादीने दाव्यात आवश्यक दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याच्या प्रती पुढील तारखेदिवशी किंवा त्यापुर्वी सादर करावयात.

Digitally signed by Vaibhav Kalyanrao Jadhav
Date: 2021.02.23 17:54:50 +0530

( वैभव क. जाधव )
४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
**<u>संगमनेर.</u>**

दिनांक :- २३/०२/२०२१.
स्थळ : संगमनेर.